# - प्रेस नोट -

दि. १२/०८/२०२६

## वडाळा पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.१०/०८/२०२६ रोजी २२.३० वा. च्या सुमारास फिर्यादी हमजा मोहम्मद अली शियारी, वय-२० वर्षे, धंदा-मेकॅनिक, रा.ठी-वडाळा, मुंबई हे हॉटेल कॅफे हासन समोर, आर. ए.किडवी मार्ग, चार रस्ता, वडाळा मुंबई येथुन बीपीटी ४ नं. गेट, बंगाली पुरा, नुरानी मस्जिद, रेल्वे पटरी जवळ, वडाळा, मुंबई येथे अटक आरोपी क्रमांक ०१ पुरूष वय-२२ वर्षे त्याचा लहान भाऊ अटक आरोपी क्रमांक ०२ पुरूष वय-२० वर्षे व त्यांचे वडील अटक आरोपी क्रमांक ०३ पुरूष वय-४९ वर्षे यांनी संगनमताने गाडी पार्कींगचा राग मनात धरून तिघांनीही धारदार हत्याराने फिर्यादी यांचे वडील नामे मोहम्मद अली शियारी यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात, हातावर, छातीवर व पाठीवर वार करून गंभीर जखमी केले तसेच फिर्यादी यांच्या हातावर व पाठीवर धारदार शस्त्राने वार करून जखमी केले तसेच फिर्यादींचा चुलत भाऊ रहिम अली शियारी यास अटक आरोपी क्रमांक ०२ याने त्याच्या पोटाच्या डाव्या बाजुस चावा घेवुन जखमी केले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. ११/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ३३०/२६, कलम १०९,११८(१),३५२, ३(५) बीएनएस २०२३, सह ४,२५ शस्त्र अधिनियम सह ३७(१)(अ),१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------